स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade





**Director Board of Examinations and Evaluation**

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520

Website: www.srtmun.ac.in

E-mail: srtmuncoe@gmail.com


संदर्भ : परीक्षा/एच्छिक वि./२०१७–१८/1129 दिनांक ३/०७/२०१७

बी.ए. व बी. एस्सी. या अभ्यासक्रमातील दोन पेपरची प्रश्नपत्रिका एकत्रित घेणे बाबत

## परिपत्रक

प्रस्तावना : बी.ए. व बी.एस्सी. या अभ्यासक्रमाकरीता प्रत्येक ऐच्छिक विषयासाठी प्रथम व द्वितीय वर्षासाठी प्रत्येकी दोन व बी.ए. तृतीय वर्षासाठी प्रत्येकी तीन पेपर आहेत. प्रत्येक पेपरची परीक्षा स्वतंत्रपणे घेतली जाते त्यामुळे परीक्षा कालावधी जास्त लागतो. तसेच शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासून पदवी अभ्यासक्रमास CBCS पॅटर्न लागू करण्यात आलेला असून, यात विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र जास्त आहे व त्यामुळे परीक्षा वेळापत्रकाचा कालावधी वाढतो करीता दोन पेपरची प्रश्नपत्रिका एकत्र करण्याची बाब विचाराधीन होती.

सबब, या विषयास दिनांक १४/७/२०१६ रोजी संपन्न झालेल्या मा.परीक्षा मंडळ बैठकीत मान्यता दिलेली आहे. तद्नंतर दिनांक ०३/०५/२०१७ रोजी संपन्न झालेल्या मा.विद्या परिषद बैठकीतही सर्वानुमते मा.विद्या परिषदेने त्यास मान्यता दिली आहे. या अनुषंगाने सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून बी.ए. व बी.एस्सी. मधील प्रत्येक ऐच्छिक विषयाची दोन पेपरची परीक्षा एकत्रित घेण्यात येणार असून, दोन्ही पेपरसाठी एकत्रित एकच प्रश्नपत्रिका असेल व त्यासाठी तीन तासाचा कालावधी असेल त्यापैकी अर्धा तास एम.सी.क्यु. साठी व अडीच तास थेअरी पेपरसाठी असेल तसेच एम.सी.क्यु. च्या दोन्ही पेपरसाठी स्वतंत्र ओ.एम.आर. सीट व थेअरीच्या दोन पेपरसाठी दोन स्वतंत्र २० पानी उत्तरपुस्तिका देण्यात येईल. परीक्षेच्या वेळी सर्व परीक्षार्थ्यींना पहिल्या अर्ध्या तासामध्ये एम.सी.क्यू. (बहुपर्यायी प्रश्न) सोडवावी लागेल व त्यानंतर थेअरी पेपर लिहावा लागेल.

या निर्णयाची अंमलबजावणी हिवाळी २०१७ च्या परीक्षेसाठी प्रथम सत्रास हा निर्णय लागू राहील यापुढे टप्याटप्याने तृतीय वर्षापर्यंत लागू होईल.

याची नोंद घ्यावी व ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणुन द्यावी.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत :

१. मा. कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र–कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४. उपकुलसचिव, शैक्षणिक संलग्नीकरण व अभ्यास मंडळे, प्रस्तुत विद्यापीठ.
५. सहायक कुलसचिव, निवडणूक व सभा व दप्तर विभाग यांना विद्या परिषद बैठकीतील ठरावाप्रमाणे कार्यवाहीचा अहवाल.
६. अधीक्षक, विज्ञान व कला विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.